झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/गुरुवार पेठ/२७०९/२०२३
दिनांक :१६/११ /२०२३.

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत आला आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/ प्र.क्र.२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

झोपडपट्टी पुनर्वसन या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(२) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद भवानी पेठ येथील सि.स.नं.२१९,२२०/१,२२०/२,२२०/३,२२०/४अ,२२०/४ब,२२१,२२२/अ,२२२/ब,२२३,२३३ व २३४ तळईवस्ती, गुरुवार पेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रामधील २७४५.४० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. सह्याद्री प्रोपर्टीज यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दि. ०५/०८/२०२२ रोजी सादर करणेत आलेला आहे आणि, सक्षम प्राधिकारी क्र.१, झो.पु.प्रा.,पुणे यांनी सदर प्रकरणात ७० % हून जास्त झोपडीधारकांचे संमतीपत्र प्राप्त असल्याचे प्रमाणीत केले आहे; आणि,

(३) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व त्रिमिती पद्धतीने परीगणनेनुसार तसेच प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार एकूण क्षेत्र २७४५.४० चौ.मी. असून सदर क्षेत्राबाबत झोपडपट्टी सदृश्य असल्याबाबतचा अहवाल उपआयुक्त, पुणे महानगर पालिका, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. उआ-५ / ४६२४, दि. २८/०९/२०२२ अन्वये प्राप्त झालेला आहे. तसेच, उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झो.पु.प्रा.,पुणे यांनीही याच आशयाचा झोपडपट्टी सदृश्य अहवाल दि. २८/०७/२०२३ रोजी सादर केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपूप्रा, पुणे यांनी दि. १३/१०/२०२३ रोजी स्थळपाहणी करून तशी खात्री केली आहे.; आणि,

(४) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२२/०८/२०२३ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ३१ ते सप्टेंबर ६, २०२३/भाद्र ९-१५, शके १९४५, पान क्र. ०६ ते ०८ मध्ये तसेच दै.पुढारी व दै. विश्वेश्वर या वृत्तपत्रात दि. २४/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर दि. २३/०८/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि,

(५) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा.,पुणे हे सक्षम आहेत; आणि,

(६) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण २७४५.४० चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे; आणि,

(७) ज्याअर्थी, सदर प्रकरणी दि. २२/०८/२०२३ रोजी अधिनियमाच्या कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारणा करणा-या आदेशा संदर्भात प्रसिद्ध केलेल्या पुर्वसूचने संदर्भात प्राप्त झालेल्या हरकतीवर दि.२५/०९/२०२३ रोजी सुनावणी घेऊन दि.१६/११/२०२३ रोजीच्या आदेशानुसार हरकती फेटाळण्यात आल्या आहेत.

त्याअर्थी, मी नीलेश र. गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीनुसार उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे .

**आदेश :-**

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.२२/०८/२०२३ रोजीचा पूर्वसुचना आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे अधिनियमांतर्गत कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई यांचे कार्यालयात अपील दाखल करता येईल.

**अनुसूची**

**झोपडपट्टीचे नाव : सि. स.नं. २१९, २२०/१, २२०/२, २२०/३, २२०/४अ, २२०/४ब, २२१, २२२/अ, २२२/ब, २२३,२३३ व २३४ तळई वस्ती, गुरुवार पेठ, पुणे**

**महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका.**

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनी भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| गुरुवार पेठ, पुणे | २१९,२२०/१,२२०/२, २२०/३,२२०/४अ, २२०/४ब,२२१,२२२/अ ,२२२/ब,२२३,२३३ २३४ | पुणे महानगर पालिका | २७४५.४० चौ.मी. | **पुर्वेस** - लागू रस्ता |
| | | | | **पश्चिमेस** - लागू बोळ व लागू सि. स. नं. १५अ |
| | | | | **दक्षिणेस** - लागू बोळ व लागू सि. स. नं. २३२ व सि. स. नं. २२४ |
| | | | | **उत्तरेस** - लागू सि. स. नं. २१४ व लागू सि. स. नं. २१५ व लागू सि. स. नं. २१८ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ :-** पुणे.

**दिनांक :-** / /२०२३.

16.11.2023

नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

O/C
8.11.23

S.R.A. Pune
940/2023
08-11-2023

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे - तळईवस्ती , गुरुवार पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन आदेश घोषीत करण्याच्या संदर्भातील कलम ३ क अंतर्गत अंतिम आदेश

१. मा. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांना सदर जमीन निमशासकीय मालकीची असल्याने आपले लक्ष महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची जागा असल्यास योजना पूर्ण झाल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १५ अ प्रमाणे राज्य शासनाच्या अनुमतीने अशी जागा प्राधिकरणामध्ये निहित करण्याची तरतूद आहे.
२. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीसाठी सादर.
३. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना निर्देशीत करण्यात येते की या अधिसूचनेच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा
४. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
५. विकसक मे.सह्याद्री प्रोपटीज, ११३/५, राम अंजनी ,१४ वी गल्ली, प्रभात रोड, पुणे -४११००४.

विकसकाचे प्रतिनिधी